**Regional Section**

# लग्न

वाटलं आता आयुष्यातल सगळं काही सरलं
आवडणाऱ्या मैत्रिणीचं लग्न जेव्हा ठरलं
म्हणाली, चांगल्या नवऱ्यासाठी नवस करायला गेलो होतो
चांगला नवराच हवा होता तर आम्ही काय मेलो होतो ?
टेंपररी नोकरीमुळे नाही विचारायचा धीर झाला
नेहमीप्रमाणे नंतर कळलं की आता फार उशीर झाला
आता प्रत्येक संध्याकाळी हिचं फक्त नवरा पुराण
दुसऱ्या पुरुषाची स्तुती ऐकून झालो आम्ही पूरते हैराण मग शेवटी
एके दिवशी आम्हाला त्याचं दर्शन झालं विचार नुसता करत
राहिलो की हयाच्यात हिने काय पाहिलं एक पर्मनंट नोकरी,
लग्नासाठी पुरेशी असू शकते ? सिक्यूरिटि ची एकच भावना
सगळयात मोठी ठरु शकते ? शेवटी ॲकसेप्ट् केलं आम्ही,
नशीबाची आहे चालच तिरकीं प्रेमासारख्या नाजुक बाबतीत ही
दैवाने आमची घेतली फिरकी लग्नानंतर दोन वर्षानी मग रस्त्यात
नवऱ्याबरोबर ती भेटली हसायलाही पैसे पडतात हयाची आम्हाला
खात्रीच पटली प्रेमाचं आम्ही विसरुन गेलो पण मैत्रीही आता शाबूत
नसते कारण आपली काही क्षणांची मैत्रीण,
ही अनंत काळाची तिच्या नवऱ्याची पत्नी असते.

कवी
**सुभाष सुर्वे**
ब्रँच एक्जीक्यूटिव
मसजीद ब्रँच

# मनाचा परिसंवाद

रखरखत्या उन्हात चैत्राची पालवी जशी मनाला तजेला देते तुझी सोबत
अशीच सुखद आठवणींना उजाळा देते........

मन विचारतं, ।। तू नक्की कोण ? ।।
मी स्वत: लाच चाचपडते, तेवढयात खोल आतून आवाज येतो.

तु सोनेरी पहाट, तु चंदेरी रात, तु माळवरचा हिरवागार घाट!
मी स्वत: शीच हसते, तु पहाटेचा वारा रे हा तुझाच खेळ सारा!
त्याचा डाव लक्षात येताच, खोटी खोटी हिरमूसते, तु चैतन्याचा उत्साह,
तु वैशाखाचा दाह........

पण तरीही,
जरी तू उजाड माळरान, तुजसवे मी हरपे भान!
जादूची कांडी फिरविल्यासारखी मी भिरभिरते आणि लख्ख आरशात स्वत:
लाच पाहून लाजते, तू खळाळता झरा, तू अवखळ जलधारा.........

पाहता पाहता अशीच हरवून जाते, तू प्रसन्न हास्य, तू रमणीय दृश्य!

काय करू, काय नको, किती ऐकू, किती नको, असं काहीतरी होऊन जातं
मन पून्हा बोलतं..........

तु शुक्रतारा सांभाळू कसा रे, तू अफाट पसारा!
त्याला आवरता आवरता मनाची लाहीलाही होते.
पून्हा एकदा तो बरसू लागतो...........

तु पावसाची रिमझिम मी भिजून ओलिचिंब।।।

खिडकीतून आलेल्या वाऱ्याच्या झुळूकीने, मला सुंदर स्वप्नातून जांग केलं,
तु रानवारा, वाहे भरारा मी रानवेडी शोधिते किनारा!
सत्य असे परी म्हणणे हे जरी देई दुजोरा.........

**प्रवीना आर थोहमरे**
एच. आर. एक्जीक्यूटिव
कॉरपरेट ऑफीस

## Answer for the Sudoku displayed on page no. 11

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 5 | 1 | 9 | 8 | 6 | 4 | 2 |
| 1 | 8 | 6 | 2 | 5 | 4 | 3 | 9 | 7 |
| 9 | 4 | 2 | 3 | 7 | 6 | 8 | 1 | 5 |
| 6 | 9 | 4 | 7 | 3 | 2 | 5 | 8 | 1 |
| 8 | 7 | 1 | 6 | 4 | 5 | 9 | 2 | 3 |
| 2 | 5 | 3 | 9 | 8 | 1 | 4 | 7 | 6 |
| 5 | 6 | 7 | 8 | 1 | 9 | 2 | 3 | 4 |
| 3 | 2 | 8 | 4 | 6 | 7 | 1 | 5 | 9 |
| 4 | 1 | 9 | 5 | 2 | 3 | 7 | 6 | 8 |

## Buddhist Wisdom

**It is very important that you do not compare your actions to your partner's or judge your partner's behavior as unskillful. Rather, focus on your own actions and take responsibility for them. Recall those times when you looked into your partner's eyes and saw the pain you caused this person you love to suffer.**

**If you can admit your own faults, if you can see how hurtful your actions were and tap into a sense of concern for your partner's well-being, then compassion and loving-friendliness will flow.**